ePaper

## मुंबई महापालिका निवडणुसाठी भाजप, शिवसेना युतीचा फॉर्म्यूला ठरला

| वर्ष - 9 | अंक -124 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

### आतील पानांत


- ‘RO-KO’ साठी 2025 वर्ष ठरले शानदार!
- 2025 हे वर्ष भारतीय हॉकीसाठी वाईटच!
- ‘सहाव्या इंद्रिया’च्या आधारे न्याय
- “काँग्रेसच्या राज्यात बुलडोझर राज”


www.mahaenews.com | रविवार, दि. 28 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**पुण्याचा श्वास अडखळला!** स्वारगेट–मंडई भागात अतिसूक्ष्म धुलीकणांचे प्रमाण धोक्याच्या पातळीवर

# विद्येच्या माहेरघरात विषारी हवा!

## ‘परिसर’ संस्थेच्या अहवालातून पुण्यातील गंभीर प्रदूषण उघड




| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**आल्हाददायक हवामान, हिरवळ आणि सांस्कृतिक वातावरणामुळे एकेकाळी पुणे हे निवृत्तीनंतर स्थायिक होण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे आवडते शहर मानले जात होते. ‘विद्येचे माहेरघर’ अशी ओळख असलेल्या या शहराची हवा सध्या मात्र गंभीर संकटात सापडली आहे. पुण्याच्या मध्यवर्ती आणि अतिशय वर्दळीच्या स्वारगेट ते मंडई परिसरातील हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. खासगी स्वयंसेवी संस्था ‘परिसर’ यांनी केलेल्या तपासणीत या भागात अतिसूक्ष्म धुलीकणांचे (पीएम २.५) प्रमाण तब्बल ३७२ पेक्षा जास्त नोंदविण्यात आले आहे.**

नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर आणि आरोग्यावर हवेच्या गुणवत्तेचा थेट परिणाम होत असतो. हे लक्षात घेऊन ‘परिसर’ संस्थेने ‘एअर क्वालिटी वॉक’ हा अभिनव प्रकल्प राबविला. स्वारगेट मेट्रो स्थानक ते मंडई मेट्रो स्थानक या सुमारे १.५ किलोमीटर अंतरावर सायंकाळच्या सुमारास पायी चालत हवेची गुणवत्ता मोजण्यात आली. या तपासणीत प्रत्येक ठिकाणी सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म धुलीकणांची पातळी, त्यामागील कारणे आणि त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा संभाव्य परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्यात आला.

‘परिसर’ संस्थेच्या वरिष्ठ समन्वयक श्वेता वेरणेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) निर्देशांनुसार मानवी आरोग्यासाठी हवेमधील धुलीकणांचे प्रमाण सुरक्षित मर्यादित असणे अत्यंत गरजेचे आहे. साधारणतः ही मर्यादा १०० च्या आसपास मानली जाते. मात्र स्वारगेट ते मंडई परिसरात अनेक ठिकाणी ही पातळी २०० च्या पुढे गेली असून, काही भागांत तर ३७२ पेक्षा अधिक नोंदविली गेली आहे. विशेषतः रहदारी जास्त असलेली ठिकाणे, वाहतूक नियंत्रण दिव्यांजवळ होणारी वाहनांची गर्दी आणि दाट लोकवस्ती असलेल्या भागांत प्रदूषणाची तीव्रता अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या ‘एअर क्वालिटी वॉक’ प्रकल्पात स्थानिक नागरिकांचाही सहभाग घेण्यात आला. नागरिकांना प्रत्यक्ष त्यांच्या परिसरातील हवेची स्थिती समजावी आणि त्याबाबत जागरूकता वाढावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. तपासणीदरम्यान वाहनांचे धूर, बांधकामांची धूळ, रस्त्यावरील सततची वाहतूक आणि कचरा जाळण्याचे प्रकार यामुळे हवेतील प्रदूषण कसे वाढते, याचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले.

अहवालानुसार, स्वारगेट ते मंडई हा परिसर पुण्याचा मध्यवर्ती भाग असून येथे दाट लोकवस्ती आहे. इमारती एकमेकांच्या अगदी जवळ असल्याने हवेला मोकळा प्रवाह मिळत नाही. परिणामी प्रदूषित हवा अडकून राहते. त्यातच मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली बांधकामे हवेत धूळ मिसळतात. हिवाळ्याच्या काळात शेकोटी पेटवणे आणि कचरा जाळण्याचे प्रमाण वाढते, ज्यामुळे हवेत घातक वायू आणि सूक्ष्म कण अधिक प्रमाणात पसरतात.

वाहनांची वाढती संख्या हेही प्रदूषणाचे एक मोठे कारण आहे. स्वारगेट आणि मंडई परिसर हा वाहतुकीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. सततची कोंडी, सिग्नलवर उभ्या राहणाऱ्या वाहनांमधून निघणारा धूर आणि कार्बन डायऑक्साइडचे वाढते प्रमाण यामुळे हवा अधिकच विषारी होत आहे. याशिवाय या भागात झाडे आणि हिरवळ यांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने प्रदूषित हवा शोषून घेणारी नैसर्गिक यंत्रणाच अपुरी पडत आहे.

अतिसूक्ष्म धुलीकण म्हणजेच पीएम २.५ हे मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक मानले जातात. हे कण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये प्रवेश करतात आणि रक्तप्रवाहातही मिसळू शकतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, हृदयरोग, डोळ्यांची जळजळ, खोकला, थकवा अशा अनेक समस्या उद्भवू शकतात. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीच आजार असलेल्या व्यक्तींना याचा गंभीर धोका संभवतो. श्वेता वेरणेकर यांनी सांगितले की, यापूर्वी पाषाण आणि इतर काही भागांमध्ये हवेची गुणवत्ता तपासण्यात आली होती. मात्र त्या तुलनेत स्वारगेट ते मंडई परिसरातील स्थिती अधिक चिंताजनक असल्याचे समोर आले आहे. आगामी काळात पुणे स्थानक, येरवडा, कात्रज, स्वारगेट यांसारख्या इतर वर्दळीच्या भागांमध्येही अशाच प्रकारची तपासणी करण्यात येणार आहे. या सर्व तपासण्यांचा सविस्तर अहवाल पुणे महापालिकेला सादर करण्यात येणार असून, त्यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

### पुण्याची ओळख धोक्यात

नागरिकांच्या आरोग्यासाठी शुद्ध हवा आणि सहज श्वास घेण्यास योग्य वातावरण असणे ही मूलभूत गरज आहे. मात्र वाढते शहरीकरण, नियोजनाचा अभाव आणि पर्यावरणाकडे होणारे दुर्लक्ष यामुळे पुण्यासारख्या शहरातही हवा श्वास घेण्यायोग्य राहिलेली नाही, हे या अहवालातून स्पष्ट होते. त्यामुळे प्रशासनाने प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर पावले उचलणे, हरित क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देणे आणि कचरा जाळण्यास आळा घालणे अत्यावश्यक बनले आहे. पुण्याची ओळख असलेले स्वच्छ, शांत आणि आल्हाददायक वातावरण टिकवायचे असेल, तर हवेच्या गुणवत्तेकडे गांभीर्याने पाहणे आता अपरिहार्य ठरणार आहे. अन्यथा ‘विद्येचे माहेरघर’ असलेले हे शहर हळूहळू श्वास घ्यायलाही कठीण होईल, असा इशारा या अहवालातून मिळतो आहे.

दोन-तीन दिवसात निर्णय... निवडणूक आयोगाचा सकारात्मक प्रतिसाद

# म्हाडाची रखडलेली सोडत मार्गी?

## १३ हजार ९८५ अर्जदार सहभागी

## घराचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार

९८५ अर्जदार स्पर्धेत असणार आहेत.म्हाडाच्या पुणे मंडळाची ४१८६ घरांची सोडत आधी तांत्रिक कारणांमुळे आणि आता आचारसंहितेमुळे रखडली आहे. सोडत रखडल्याने अर्जदार प्रचंड नाराज असून पुणे मंडळावर टीका होऊ लागली आहे. त्यामुळे आता पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी नुकतीच राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेऊन सोडतीस परवानगी देण्याची मागणी केली.




। पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**म्हाडाच्या पुणे मंडळाची ४१८६ घरांची सोडत आधी तांत्रिक कारणांमुळे आणि आता आचारसंहितेमुळे रखडली आहे. सोडत रखडल्याने अर्जदार प्रचंड नाराज असून पुणे मंडळावर टीका होऊ लागली आहे. त्यामुळे आता पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी नुकतीच राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेऊन सोडतीस परवानगी देण्याची मागणी केली. या मागणीला अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून सोडतीचा मार्ग मोकळा करण्यासंबंधी मुख्य सचिवांशी चर्चा करून येत्या दोन-तीन दिवसांत सोडतीच्या परवानगीबाबतचा निर्णय जाहीर केला जाईल, असे अधिकाऱ्यांनी आश्वासित केले.**

पुणे मंडळाने २० टक्के सर्वसमावेश योजना आणि १५ टक्के एकात्मिक योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या ४१८६ घरांसाठी सप्टेंबरपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू केली. मात्र तांत्रिक अडचणींमुळे, प्रतिसाद वाढविण्यासाठी सोडतपूर्व प्रक्रियेस दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळे सोडत दोन वेळा लांबणीवर पडली. तर सोडतपूर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोडत पार पडेल असे वाटत असतानाच तांत्रिक अडचणींमुळे अर्थात अर्जांची छाननी करण्यास विलंब झाल्याने तिसऱ्यांदा सोडत पुढे गेली आणि त्यानंतर सोडत रखडली ती रखडलीच. पुढे पालिका निवडणुकांची आचारसंहिता लागू झाली आणि सोडत आचारसंहितेत अडकली. तीन वेळा सोडतीची तारीख पुढे ढकलण्यात आल्याने आणि आता सोडत रखडल्याने अर्जदारांमध्ये प्रचंड नाराजी आहे. अनेकांनी कर्ज घेऊन, क्रेडिट कार्डने अनामत रक्कम भरली. सप्टेंबरपासून अनामत रक्कम म्हाडाकडे अडकल्याने अर्जदार आर्थिक अडचणीत आले आहेत. त्यामुळे सोडत लवकरात लवकर काढण्याची मागणी होत आहे. सोडत काढणे शक्य नसेल तर अनामत रक्कमेवर व्याजाची मागणीही समाजमाध्यमाद्वारे केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आता अखेर पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दोन दिवसांपूर्वी दिनेश वाघमारे यांची भेट घेतली. यावेळी आचरसंहितेच्या काळात सोडत काढण्यास परवानगी देण्याची मागणी त्यांनी केली. ही म्हाडाची नियमित प्रक्रिया असून सोडतीची सर्व प्रक्रिया आचारसंहितेआधी पूर्ण झाली आहे. आता केवळ निकाल जाहीर करायचा आहे. निवडणूक आयोगाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सोडतीचा निकाल जाहीर करण्यास कोणतीही अडचण नाही. मात्र यासाठी मुख्य सचिव, तसेच गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिवांशी निवडणूक आयोग चर्चा करणार आहे. त्यानंतर सोडतीचा अंतिम निर्णय जाहीर करू, असेही दिनेश वाघमारे यांनी सांगितल्याची माहिती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिली. निवडणूक आयोगाने सोडतीचा निकाल जाहीर करता येईल असे संकेत दिले आहेत. तेव्हा दोन – तीन दिवसांत निवडणूक आयोगाकडून अंतिम निर्णय येईल आणि सोडत आठवड्याभरात काढली जाईल, असा विश्वास आपल्याला असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे आता अर्जदारांचे आणि पुणे मंडळाचे लक्ष निवडणूक आयोगाच्या निर्णयाकडे लागले आहेहरकती लक्षात घेत शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता पुणे मंडळाने पात्र अर्जांची अंतिम यादी प्रसिद्ध केली. या यादीनुसार दोन लाख १३ हजार ९८५ अर्ज पात्र ठरले आहेत. तर १ हजार ९८० अर्ज अपात्र ठरले आहेत. आयकर विवरण पत्र, जात प्रमाणपत्र वा इतर कागदपत्रांमधील त्रुटी आणि इतर कारणांमुळे अर्ज अपात्र ठरले आहेत.

# एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत दुफळी

## पुण्यातील शिवसेनेच्या बैठकीत जागावाटपावरून अंतर्गत वाद




## आम्ही २५ जागांवर ठाम

यावाबत गोऱ्हे यांनी भानगिरे यांचे गैरसमज दूर केले जातील, असे स्पष्ट केले.जागावाटपाबाबत शिवसेना पक्षांतर्गत बैठकीत निर्णय झाला आहे. सायंकाळी किंवा रात्रीपर्यंत पक्षश्रेष्ठी एकनाथ शिंदे अंतिम निर्णय घेतील. मात्र, पुण्यामध्ये २५ जागा मिळण्याच्या भूमिकेबाबत आम्ही ठाम आहोत. महायुती टिकविण्याची जबाबदारी सर्व घटक पक्षांवर आहे. कोणी किती ताणून धरले आहे, यापेक्षा विकासाच्या दृष्टीने रणनीती आखणे अपेक्षित आहे. जागांचा तिढा लवकरात लवकर सुटावा. निरर्थक गैरसमज पसरत आहेत. त्यामुळे आजच निर्णय होईल, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले.

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महानगरपालिका निवडणुकीमध्ये महायुतीतील घटक पक्ष भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) या पक्षांमधील जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नसताना शनिवारी एका हॉटेलमध्ये शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत आमदार विजय शिवतारे आणि शहर प्रमुख नाना भानगिरे यांच्यामध्ये शाब्दिक चकमक झाली. संताप व्यक्त करत भानगिरे बैठकीतून निघून गेले. यावरून शिवसेनेतच अंतर्गत दुफळी निर्माण झाली का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

याबाबत विधानपरिषदेच्या उपसभापती आणि शिवसेनेच्या उपनेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी, 'शिवसेना पक्षाच्या बैठकीत असे प्रकार घडतच असतात. मात्र, भानगिरे हे पक्षाचे जबाबदार कार्यकर्ते असून त्यांनी भरपूर विकासकामे केली आहेत. भानगिरे यांचा गैरसमज झाला असल्यास तो दूर केला जाईल,' अशी स्पष्टोक्ती दिल्याने या वादाला दुजोरा मिळाला. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. गोऱ्हे यांच्या घराबाहेर गर्दी करत नाराजी व्यक्त केली होती. तसेच महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्यासाठीचे मोजकेच दिवस शिल्लक राहिले असताना, अद्याप महायुतीतील भाजप, शिवसेना पक्षांमधील जागांचा तिढा सुटलेला नाही. भाजपने शिवसेनेला १५ जागा देऊ केल्या आहेत. मात्र, शिवसेनेने २५ जागा मागितल्या आहेत.

तसेच पूर्वी मागितलेल्या १५ जागांचा यामध्ये समावेश नसल्याने कार्यकर्ते नाराज आहे. याबाबत डॉ. गोऱ्हे यांच्याकडून बैठका घेतल्या जात आहेतआलेले आबा बागूल आणि इतर पदाधिकाऱ्यांसोबत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शनिवारी बैठक घेतली. शिवतारे यांच्यात शाब्दिक चकमक उडाली असल्याचे सांगण्यात आले.

मिशन पीसीएमसी 2025-26

भोसरीतून १८, तर चिंचवडमधील १२ माजी नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

# राष्ट्रवादीने 2017 मध्ये जिंकलेल्या जागा भाजपकडून 'टार्गेट'

## भाजपच्या दुसऱ्या स्थानावर असलेल्या जागांवरील उमेदवार खेचण्याची राष्ट्रवादी पक्षाचीही व्यूहरचना

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील राष्ट्रवादीचा गड उद्ध्वस्त करण्यासाठी २०१७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मिशन लोटस' राबविले. भाजपची सत्ता यावी, यासाठी तत्कालीन एकत्रित राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोहरे फोडले. निवडणुकीपूर्वी भोसरीतून एकाच वेळी १८ जणांना प्रवेश दिला होता. चिंचवडमधील १२ नगरसेवक भाजपमध्ये आले होते..**



राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आणि निवडून आलेले प्रभाग

चारही सदस्य निवडून आलेले: प्रभाग ९ नेहरूनगर, प्रभाग १२ तळवडे.

चारपैकी तीन सदस्य निवडून आलेले: प्रभाग २० संत तुकारामनगर, प्रभाग २१ पिंपरीगाव. प्रभाग २२ काळेवाडी, प्रभाग ३० दापोडी. दोन सदस्य निवडून आलेले: प्रभाग ५ गव्हाणे वस्ती, प्रभाग १४ आकुर्डी गावठाण, प्रभाग १६ रावेत, किवळे, प्रभाग २८ पिंपळे सौदागर, चारपैकी एक सदस्य निवडून आलेले: प्रभाग १ चिखली, प्रभाग ३ चऱ्होली , प्रभाग ८ इंद्रायणीनगर, प्रभाग १३ निगडी गावठाण, प्रभाग १५ प्राधिकरण, प्रभाग १८ चिंचवडगाव, प्रभाग २४ थेरगाव, गणेशनगर, प्रभाग २५ वाकड गावठाण.

### भाजपमध्ये यांचे झाले 'इनकमिंग'

तत्कालीन राष्ट्रवादीत असलेले माजी महापौर संजोग वाघेरे, स्थायी समितीच्या माजी अध्यक्ष उषा वाघेरे, राष्ट्रवादीचे नेते राहुल कलाटे, महापौर माजी महापौर राजू मिसाळ, त्याचबरोबर माजी स्थायी समिती सभापती प्रशांत शितोळे, नवनाथ जगताप, माजी विरोधी पक्षनेते विनोद नढे, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, माजी नगरसेवक संजय काटे, विनया तापकीर, आशा सूर्यवंशी, प्रवीण भालेकर, समीर मासुळकर, प्रसाद शेट्टी, जालिंदर शिंदे, प्रदीप तपकीर यांना भाजपने महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षामध्ये प्रवेश दिला आहे. पदे देऊनही अनेकांनी साथ सोडल्याने अजित पवार अस्वस्थ आहेत. महापालिकेत गतवेळी शिवसेनेच्या नऊ जागा होत्या. त्यापैकी सात जण भाजपमध्ये आले आहेत.

# 'दिंडी-मतदानाची' काढत केला लोकशाहीचा जागर!

## महापालिकेद्वारे वारकरी परंपरेच्या साजात, राबवण्यात आला मतदार जनजागृतीचा अभिनव उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**"मतदार राजा जागा हो-लोकशाहीचा धागा हो" अशा घोषणानी दुमदुमला परिसर सोबत टाळ-मृदुंगाचा गजर.. लोकशाहीच्या मूल्यांचा जयघोष..महापुरुषांची वेशभूषा साकारलेले विद्यार्थी..वारकरी परंपरेचा साज आणि भक्तिरसाने भारलेले वातावरण..अशी संस्कार, इतिहास आणि मतदानाचे महत्व यांचा संगम साधणारी 'मतदानाची दिंडी' पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली येथील संतपीठ परिसरात काढण्यात आली. या दिंडीच्या माध्यमातून प्रत्येक मतदाराने मतदान करणे हीच लोकशाहीची खरी ताकद असल्याचा संदेश देण्यात आला.**



पिंपरी चिंचवड | पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली असून, या निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली महापालिका हद्दीत स्वीप कार्यक्रमांतर्गत व्यापक मतदान जनजागृती मोहीम सुरू आहे.

या अंतर्गत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, संतपीठ येथील प्राचार्य ज्ञानेश्वर गाडगे तसेच विद्यार्थ्यांचे पालक यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिकेच्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ शाळा येथे 'दिंडी-मतदानासाठी ' हा अभिनव उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. वारकरी परंपरेचा साज चढवलेले विद्यार्थी, टाळ-मृदुंगाच्या गजरात, भक्तिरसाने भारलेले वातावरण, अशा उत्साहपूर्ण वातावरणात शाळेच्या परिसरातून निघालेली मतदानाची दिंडी जवळच असणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्या, कॉलनी येथे गेली. त्याठिकाणी नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.हा उपक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका स्नेहल पगार, समन्वयिका मयुरी मुळुक यांच्यासह शाळेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचे पालक देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी मतदान प्रक्रियेत प्रत्येक मतदाराचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना हे समजावून सांगावे की मतदानाचा दिवस ही केवळ सुट्टी नसून लोकशाहीच्या मजबुतीसाठीची जबाबदारी आहे. जसे तुम्ही खाऊसाठी आई-वडिलांकडे हट्ट धरता, तसाच हट्ट शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी मतदान करण्यासाठी करावा. अशा अभिनव आणि संस्कारक्षम उपक्रमांतून निश्चितच मतदानाचा टक्का वाढेल. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून कुटुंबांपर्यंत मतदानाचे महत्त्व पोहोचवणारा हा उपक्रम असून, पालकांपर्यंत प्रभावीपणे मतदानाचा संदेश पोहोचविण्यात येईल.

**कीर्तनातून सांगण्यात आले मतदानाचे महत्त्व..**

संतपीठ शाळेतील विद्यार्थिनी ह.भ.प. श्रुती रोडे हिने कीर्तनातून मतदानाचे लोकशाहीतील अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. मतदानामुळे लोकशाही कशी बळकट होते आणि नागरिकांची जबाबदारी कशी अधिक दृढ होते, याचे प्रभावी प्रबोधन या सादरीकरणातून घडले. याच वेळी मतदान जनजागृतीपर पथनाट्यही सादर करण्यात आले.

**"हक्क आपल्या मतदानाचा" गीताचे सादरीकरण..**

संतपीठ शाळेतील विद्यार्थ्यांनी "हक्क आपल्या मतदानाचा" हे प्रेरणादायी गीत सादर केले. हे गीत संतपीठ शाळेतील शिक्षकांनी रचले असून, विद्यार्थ्यांना गीत सादर करताना किबोर्ड वादक श्रुती तनपुरे, पखवाज वादक अविनाश भोगील आणि तबला वादक विवेक भालेराव यांनी साथ दिली. या गीताच्या सादरीकरणानंतर विद्यार्थ्यांना महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी राबवण्यात येत असलेल्या 'प्रिय आई-बाबा, पत्रास कारण की...' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पत्रांचे वाटप करण्यात आले.

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू" अशी शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.



भूमिका

# लोकानुनय करणं हे कलाकारांचं काम नाही!

**कलाकाराने नेहमी व्यवस्थेला अस्वस्थ करण्याचं, हलवण्याचं काम केलं पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ अभिनेत्री रत्ना पाठक शाह यांनी व्यक्त केली. 'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम सोहळयात प्रमुख अतिथी म्हणून त्या उपस्थित होत्या. लेखक, दिग्दर्शक रावबा गजमल, लेखक दिग्दर्शक अजय पाटील आणि लेखिका प्रा. अपूर्वा भिलारे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.**



तरुण रंगकर्मी नेहमी एनएसडीसारख्या संस्थेत जाऊन शिक्षण घेण्याचं स्वप्न पाहतात, मात्र अशा नामांकित संस्थेत प्रवेश मिळाला नाही, तरी खचून जाण्याची गरज नाही. नाटक ही कला आपल्याकडे हजारो वर्षांपासून चालत आली आहे. लोक नाटक करता करता शिकत जातात. नाटकाचं औपचारिक प्रशिक्षण घेतलंच पाहिजे या कल्पनेवर बहुधा विसाव्या शतकात जोर दिला गेला. विविध प्रकारचे लोक नाटकाचा अभ्यास करू शकतील अशी जागा असली पाहिजे, या विचाराने एनएसडीसारख्या नाटय प्रशिक्षण संस्था उभारल्या गेल्या. त्या काळाच्या अनुषंगाने तो विचार अगदी योग्य होता. देशाच्या कानाकोपऱ्यांतून लोक एनएसडीमध्ये येतील, आपल्याबरोबर परंपरागत ज्ञान आणतील आणि त्याच्या जोडीने नव्याचा शोध घेतील. तिथल्या प्रशिक्षणात, तिथे सादर होणाऱ्या नाटकांत या साऱ्याचा अर्क उतरेल, अशी कल्पना त्यामागे होती. वास्तवातला अनुभव मात्र कल्पनेपेक्षा वेगळा होता.मी एनएसडीत होते तेव्हा कर्नाटकातल्या पारंपरिक संगीत नाटयक्षेत्रात लोकप्रिय असलेले नाटयदिग्दर्शक आणि एनएसडीचे माजी विद्यार्थी व्ही. व्ही. कारंथ संचालक होते. तीन वर्षांचा अभ्यासक्रम होता. पहिल्या वर्षी सर्वांना एकसारखंच शिक्षण घ्यावं लागे. त्यानंतरची दोन वर्षे विद्यार्थ्यांनी अभिनय, दिग्दर्शन किंवा नाटकाच्या तांत्रिक बाजू (स्टेज क्राफ्ट – रंगभूषा, वेशभूषा, निर्मिती व्यवस्था, प्रकाशयोजना, नेपथ्य, इ.) यापैकी एका विषयात विशेष प्रावीण्य प्राप्त करणं अपेक्षित होतं. या पद्धतीत एक उतरंड निर्माण होत असे. अभिनय शिकणाऱ्यांना अधिक महत्त्व मिळे. दिग्दर्शक विचार करत बसत. एक प्रकारे 'स्टार सिस्टिम' तयार झाली होती. कारंथ यांनी ते चक्र तोडायचं ठरवलं. त्यांनी सर्व विषय तिन्ही वर्षं एकत्रित शिकवले जावेत, असा निर्णय घेतला. त्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याला भलेही फक्त अभिनयात रस असेल, पण म्हणून प्रकाशयोजना वा भारतीय अभिजात नाटकांचा अभ्यास त्याला बुडवता येत नसे. नाटकाबद्दलची माणसाची सर्वांगीण समज वाढवण्याच्या उद्देशाने, एक माणूस म्हणून विद्यार्थ्यांना तयार करण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षणक्रम आखले गेले होते आणि हे उद्दिष्ट काही अंशी साध्यही झाले. नाटयशिक्षक घडवण्याची गरज आहे. आपल्याकडे पारंपरिक संगीत, नृत्यकला वा अगदी दशावतारासारखी लोककला पाहिली तर गुरू-शिष्य परंपरेला महत्त्व आहे. ज्ञान- संस्कारांची देवाणघेवाण झाली पाहिजे, जे एनएसडीत प्रत्यक्षात येईल, असं वाटलं होतं. थोडयाफार प्रमाणात ते शक्य झालं. एनएसडीतील काळात मला एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे मला कोणी शिकवू शकत नाही, पण मी शिकू शकते. तिथे आम्ही ३३ विद्यार्थी होतो. प्रत्येकाला नाटकात काम मिळणं शक्य नव्हतं. आमच्यासारखे काहीजण होते जे तिथल्या ग्रंथालयात पडीक असत. इतकं उत्तम ग्रंथालय उभारणं हे इब्राहिम अल्काझी यांचं एक मोठं योगदान. मला जे शिकायचं आहे ते वर्गात मिळत नसेल तर पर्यायी मार्ग काढणं गरजेचं होतं. नाटयक्षेत्रात अभियांत्रिकी वा वैद्यकीय अभ्यासक्रमांसारखे तयार अभ्यासक्रम नाहीत, जे पूर्ण करून नोकरी मिळवता येते. इथे तुमचा मार्ग तुम्हालाच शोधावा लागतो. त्यासाठी लोकांशी बोलणं, नाटक पाहणं, संहिता वाचणं, निरीक्षण गरजेचं असतं. तरुण कलाकारांपैकी कितीजण नाटक वाचतात? संहिता वाचायची नसेल, तर या क्षेत्रात येऊच नका. मला माझ्या या शोधयात्रेत सत्यदेव दुबेंसारखा मार्गदर्शक भेटला. त्यांनी मला नाटक काय असतं हे शिकवलं. आपण अशा बेभरवशी क्षेत्रात आहोत, जिथे आई-वडिलांकडून, समाजाकडून पाठिबा मिळणं कठीण आहे. पण सगळीकडून मिळणारे नकार पचवूनही आपण नाटयक्षेत्रात आहोत, याचाच अर्थ मनाला समाधान देणारं काहीतरी इथे आहे, जे अन्यत्र नाही.

## प्रासंगिक »

### सण की वेसण?

***नाताळच्या गळचेपीचा विषय पक्षीय राजकारणापुरता वापरणे योग्य नाहीच.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काहीही केले तरी टीकाकार सज्जच असतात, हे अर्धसत्य. त्याच्या पुढला भाग असा की, प्रसंगी मोदी यांनी काहीच केले नाही तरीसुद्धा टीका होऊ शकते. त्याहीपुढले पूर्णसत्य असे की, राजकारणातील व्यक्ती कशात लक्ष घालताहेत आणि कशाकडे दुर्लक्ष करताहेत, यावर अनेकांची नजर असते. लोकशाही मूल्यांचा प्रसार जगभर झाल्यानंतर हे असे कोणत्याही देशात होणारच. या वास्तवाचा प्रत्यय यंदाच्या नाताळदिनी आला. मोदी दिल्लीतल्या एका चर्चमध्ये जाऊन नाताळच्या प्रात:प्रार्थना सभेत सहभागी झाले. त्या चर्चचे प्रमुख पाद्री रेव्हरंड पॉल स्वरूप यांनी 'विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या महान देशाचे नेतृत्व करण्यासाठी उदंड बळ देण्या'साठी जाहीरपणे प्रार्थना करूनच 'आमेन' म्हटले. यावर टीकाकारांचे म्हणणे असे की, ख्रिस्ती मतदारसंख्या अधिक असलेल्या केरळसारख्या राज्यात विधानसभा निवडणूक तोंडावर असल्यामुळेच मोदींनी चर्चमध्ये जाण्याचे राजकारण केले.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी उच्चशिक्षण व्यवस्थेसंबंधातील 'विकसित भारत शिक्षा अधिष्ठान बिल' (व्हीबीएसए) हे महत्त्वाचे विधेयक संसदेत मांडले. सध्या ते विधेयक पुढील चर्चासाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले आहे.

# शिक्षणाचा विस्तार सरकारी निधीतूनच शक्य!

या बिलाच्या माध्यमातून आताचे विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई) आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद (एनसीटीई) या तीन नियामक यंत्रणा बरखास्त करून त्या जागी विकसित भारत शिक्षा अधिष्ठान ही एकच नियामक संस्था स्थापण्यात येणार आहे. यामुळे शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र असा बदल होणार, असा सरकारचा दावा आहे. पण देशातील कोटय़वधी युवक-युवतींच्या जीवनाशी संबंधित या महत्त्वाच्या विषयावर व्यापक चर्चा आवश्यक आहे.'व्हीबीएसए'मुळे आता शिक्षण संस्थांना काही नवीन कोर्स चालू करण्यासाठी किंवा नवीन कॉलेज उघडण्यासाठी वेगवेगळय़ा नियामकांकडे जाण्याची गरज नाही. थोडक्यात 'व्हीबीएसए' ही एक खिडकी व्यवस्था असेल जेणेकरून वरील कामे पूर्वीपेक्षा जलद होतील. कॉलेजेस वा कॉर्सेसची उपलब्धता वाढली की आपोआपच अधिक विद्यार्थी उच्चशिक्षणात येतील, ही



यामागील धारणा. 'व्हीबीएसए'च्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक संस्थांना पूर्णपणे स्वायत्त करणे, परंतु 'व्हीबीएसए'ला मात्र जराही स्वायत्तता नाही. विधेयकातील कलम ४७ केंद्र सरकारला अधिक्रमणाचा अधिकार- म्हणजेच 'व्हीबीएसए'वर संपूर्ण नियंत्रण देते. अशा प्रकारची अधिक्रमणाची तरतूद 'यूजीसी' कायद्यात नव्हती. आणखी एक उद्दिष्ट म्हणजे भारताचा ग्रॉस एनरोलमेंट रेश्यो (जीईआर- १८ ते २३ वयाच्या दर १०० तरुणांपैकी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांचा टक्का) २०३५ पर्यंत ५० टक्क्यांवर नेणे हा आहे (विकसित देशांत हे प्रमाण आताच किमान ६० टक्के, तर काही देशांत ८०-९० टक्के आहे). सरकारच्याच 'अ. भा. उच्चशिक्षण सर्वेक्षण २०२१-२२' नुसार आपला 'जीईआर' २८.४ टक्के इतका आहे. हे सर्वेक्षण २०२४ मध्ये प्रकाशित झाले. आणि २०२१-२२ नंतर (इतर महत्त्वाच्या सर्वेक्षणांप्रमाणे) अद्याप तरी अहवाल आलेला नाही. पण मागील काही वर्षांतील कल पाहता सध्या देशाचा जीईआर ३१ टक्क्यांच्या जवळपास असण्याची शक्यता आहे. हाच जीईआर २०१४-१५ मध्ये २३.७ टक्के होता. म्हणजे मागील ११ वर्षांत जेमतेम सात टक्क्यांनी वाढला. याउलट त्यामागच्या २००४-०५ ते २०१४-१५ या दहा वर्षांत जीईआर १०.६ टक्के होता तो २३.७ टक्के झाला, म्हणजे १३ टक्क्यांनी वाढला होताउच्च शिक्षणासाठी केलेली तरतूद (रु. ५०,०७८ कोटी) ही २०२३-२४ या वर्षांत खर्च केलेल्या ५५,३९३ कोटी रु. रकमेपेक्षाही कमी आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण गेल्या दहा वर्षांत १.४ टक्क्यांवरून ०.९८ टक्के इतका खालावले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## योगी यांनी उत्तर द्यावे ठाकरेंनी विचारला करोना काळातील हिशोब !

# तेव्हा प्रेतं रस्त्यावर का होती ?

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**करोना काळात उत्तर प्रदेशमध्ये मृतांचे पार्थिव रस्त्यावर होते. तसेच त्यांचे दहन केले जात होते. उत्तर प्रदेशातील करोना काळातील स्थितीची तुलना मुंबई, महाराष्ट्रातील प्रारुपाशी होऊ शकते का, असा प्रश्न करीत करोना काळात उत्तर प्रदेशातील प्रशासन असे का होते, याचे उत्तर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी द्यावे, असे आव्हान शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी दिले.**

### ठाकरेंचे दोन माजी महापौर भाजपात



पालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि मनसेची युती जाहीर केल्यानंतर स्थानिक पातळीवर या दोन्ही पक्षांना हादरे बसले. निवडणूक नियोजनात सहभागी असणारे ठाकरे गटाचे प्रमुख पदाधिकारी भाजपमध्ये सहभागी झाल्याने पक्षाला मोठा धक्का बसला. उमेदवारी अर्ज भरण्यास अल्पसा कालावधी असल्याने आधी खासदार अनिल देसाई आणि ज्येष्ठ नेते रवींद्र मिर्लेकर हे नाशिकमध्ये दाखल झाले. दुसऱ्याच दिवशी म्हणजे शनिवारी आदित्य ठाकरे हे देखील नाशिकमध्ये आले. तपोवनला भेट दिल्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.महापालिका निवडणूक प्रचारासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. या संदर्भातील प्रश्नावर ठाकरे यांनी करोना काळातील उत्तर प्रदेशमधील स्थितीवर बोट ठेवले. करोना काळात उत्तर प्रदेशमध्ये बिकट स्थिती होती. पार्थिव रस्त्यावर पडलेले होते. त्यांचे तसेच दहन केले जात होते. करोना काळात उत्तर प्रदेशमधील प्रशासकीय व्यवस्था अशी का होती, हे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगण्याची गरज असल्याचे त्यांनी सूचित केले.तेव्हाची उत्तर प्रदेशमधील स्थिती आणि मुंबईसह महाराष्ट्र हाताळलेली स्थिती यांची तुलना होऊ शकत नाही. मागील दहा वर्षात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशमध्ये मुंबईच्या जवळपास पोहोचू शकेल, असे घडवलेले एखादे शहर दाखवावे, असे आव्हानही त्यांनी दिले. अत्याचार प्रकरणातील कुलदीपसिंग याला नुकतेच सोडण्यात आले. असे प्रशासन ते चालविणार आहेत का, असा प्रश्न ठाकरे यांनी केला.

### भाजपचे 'तापोवन' झाले

करोना काळात उत्तर प्रदेशमध्ये मृतांचे पार्थिव रस्त्यावर होते. तसेच त्यांचे दहन केले जात होते. उत्तर प्रदेशातील करोना काळातील स्थितीची तुलना मुंबई, महाराष्ट्रातील प्रारुपाशी होऊ शकते का, असा प्रश्न करीत करोना काळात उत्तर प्रदेशातील प्रशासन असे का होते, याचे उत्तर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी द्यावे, असे आव्हान शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी दिले.

ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देणाऱ्यांना भाजप प्रवेशासाठी कार्यालयात दोन तास प्रतिक्षा करावी लागली होती. भाजप कार्यालयाचे 'तापोवन' झाले होते. आयारामांमुळे भाजपचे कित्येक वर्षांपासून निष्ठेने काम करणाऱ्यांविषयी वाईट वाटते. मेहनत करणाऱ्यांचे भवितव्य अधांतरी बनले. भ्रष्टाचारी लोकांना पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या कार्यकर्त्यांच्या डोक्यावर बसवले जात असून अखेरीस त्यांना नोटाचा पर्याय स्वीकारावा लागेल, असे आदित्य ठाकरे यांनी नमूद केले. ठाकरे गटातून बाहेर पडणारे पक्षाचे नेते भेटत नसल्याचा सूर आळवत असल्याच्या प्रश्नावर त्यांनी भाजपमध्ये जाणाऱ्यांना आता रोज दिल्लीला भेटीसाठी जाण्याची रेल्वे मिळणार असल्याचा टोला हाणला. ईडी. सीबीआय, वॉशिंग मशीन ज्यांच्याकडे आहे, त्यांच्याकडे भ्रष्टाचारी जात आहे. अशी मंडळी दूर झालेली बरी, असेही ठाकरे यांनी सांगितले.

## ठाकरे गट आणि मनसेत काही जागांवरून मतभेद?

### ठाकरे गट आणि मनसेतील जागावाटपाचा फॉर्म्युला कसा असेल?

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकींची घोषणा झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर राजकारणात मोठ्या घडामोडी सुरू आहेत.**

मुंबईत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरू होत्या. त्यानंतर अखेर २४ डिसेंबर रोजी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीची अधिकृत घोषणा केली.ठाकरे गट आणि मनसेच्या युतीची घोषणा झाली असली तरी अद्याप ठाकरे गट आणि मनसेतील जागावाटपाचा फॉर्म्युला नेमका कसा असेल? हे जाहीर करण्यात आलेलं नाही. त्यामुळे जागावाटपावरून ठाकरे गट आणि मनसेत मतभेद असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान, यावर आता मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी सविस्तर भाष्य केलं आहे.



'काही जागांमध्ये आदलाबदल करण्याबाबत चर्चा सुरू आहे. यावर अंतिम निर्णय झाल्यानंतर आम्ही जागा वाटपाची घोषणा करू', असं नांदगावकरांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं आहे.मातोश्रीवर आम्ही आलो होतो. काही जागांमध्ये आदलाबदल करण्याचा विषय होता. त्यासाठी आम्ही मातोश्रीवर आलो होतो. त्यावर आता चर्चा झाली आहे. आज रात्री आम्ही पुन्हा चर्चा करणार आहोत. त्यानंतर आम्ही अंतिम निर्णयावर येऊ. त्यानंतर आमची जागा वाटपाची घोषणा होणार आहे. आज आम्ही एवढ्यासाठीच मातोश्रीवर आलो होतो, संदीप देशपांडे, नितीन सरदेसाई आणि मी असे आम्ही तिथे चर्चा करण्यासाठी आलो होतो. आता आम्ही पुन्हा राज ठाकरे यांच्याबरोबर चर्चा करणार आहोत", असं बाळा नांदगावकर यांनी म्हटलं आहे. शिवडी, विक्रोळी, माहिम, भांडूप या ठिकाणी ज्या जागा मिळत आहेत त्यावर पक्ष समाधानी नसल्याची चर्चा आहे, असा प्रश्न पत्रकारांनी बाळा नांदगावकर यांना विचारला."युतीच्या चर्चांमध्ये काही जागा द्याव्या लागतात आणि काही जागा घ्याव्या लागतात. देवाण-घेवाण होत असते. आम्ही आमच्या अनुभवाने युतीची वाटाघाटी करत आहोत.

### भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा

त्या प्रमाणे जेवढ्या जागा आमच्या पदरात पाडून घेता येतील तेवढा प्रयत्न आम्ही करत आहोत", असं बाळा नांदगावकर यांनी म्हटलं. मला बाकी जे बोलायचंय ते जाहीर सभांमधून बोलेन. मात्र, मी एका मुलाखतीत बोलताना म्हटलं होतं की, कोणत्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे.

## बलात्कार प्रकरणात शिक्षा रद्द

## सहमतीने झालेल्या संबंधांचा समावेश

# 'सहाव्या इंद्रिया'च्या आधारे न्याय

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने एका दुर्मीळ निर्णयात, 'सहाव्या इंद्रिया'च्या आधारावर बलात्काराच्या आरोपाखाली १० वर्षांची शिक्षा भोगणाऱ्या एका पुरुषाची शिक्षा आणि त्याला दोषी ठरवणारा निकाल रद्द केला. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की या प्रकरणात सहमतीने झालेल्या संबंधांचा समावेश होता जो गैरसमजामुळे गुन्हा ठरवण्यात आला होता.**

## गैरसमजामुळे गुन्हा ठरवण्यात आला



'जेव्हा हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर आले, तेव्हा प्रकरणातील तथ्ये विचारात घेतल्यानंतर, आम्हाला असे वाटले की जर अपीलकर्ता आणि पीडितेने एकमेकांशी लग्न करण्याचा निर्णय घेतला तर त्यांना पुन्हा एकदा एकत्र आणता येईल',असे न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले.पक्षकारांनी या वर्षी जुलैमध्ये लग्न केले होते आणि तेव्हापासून ते एकत्र राहत होते. ५ डिसेंबरच्या निकालात न्यायालयाने म्हटले आहे की, हे दुर्मीळ प्रकरणांपैकी एक आहे जिथे या न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर, अपीलकर्त्याला त्याच्या दोन्ही शिक्षा रद्द करण्याचा फायदा झाला. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या एप्रिल २०२४ च्या शिक्षेला स्थगिती देण्याच्या अर्जाला आव्हान देणाऱ्या एका पुरुषाच्या अपिलावर न्यायालयाने हा निर्णय दिला. कनिष्ठ न्यायालयाने या प्रकरणात पुरुषाला दोषी ठरवले आणि त्याला १० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आणि ५५,००० रुपयांचा दंड ठोठावला. खंडपीठाच्या म्हणण्यानुसार, त्यांनी अपीलकर्ता आणि महिलेशी त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत बोलावले आणि त्यांना लग्न करण्यास तयार असल्याचे कळले. न्यायालयाने अपीलकर्त्याला अंतरिम जामीन मंजूर केला

या प्रकरणात पूर्ण न्याय करण्यासाठी संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत आमच्या अधिकारांचा वापर केला आहे आणि तक्रार तसेच अपीलकर्त्याविरुद्ध दिलेली शिक्षा आणि शिक्षा बाजूला ठेवली आहे. आमचे असे मत आहे की गैरसमजामुळे, पक्षकारांमधील संमतीने झालेल्या संबंधांना गुन्हेगारीस्वरूप देण्यात आले आणि लग्नाच्या खोट्या वचनाच्या गुन्ह्यात रूपांतरित करण्यात आले, प्रत्यक्षात दोन्ही पक्ष एकमेकांशी लग्न करण्याचा विचार करत होते. सर्वोच्च न्यायालयाने एका दुर्मीळ निर्णयात, 'सहाव्या इंद्रिया'च्या आधारावर बलात्काराच्या आरोपाखाली १० वर्षांची शिक्षा भोगणाऱ्या एका पुरुषाची शिक्षा आणि त्याला दोषी ठरवणारा निकाल रद्द केला. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की या प्रकरणात सहमतीने झालेल्या संबंधांचा समावेश होता जो गैरसमजामुळे गुन्हा ठरवण्यात आला होता.आम्हाला असे वाटले की जर अपीलकर्ता आणि पीडितेने एकमेकांशी लग्न करण्याचा निर्णय घेतला तर त्यांना पुन्हा एकदा एकत्र आणता येईल',असे न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले. पक्षकारांनी या वर्षी जुलैमध्ये लग्न केले होते आणि तेव्हापासून ते एकत्र राहत होते. ५ डिसेंबरच्या निकालात न्यायालयाने म्हटले आहे की, हे दुर्मीळ प्रकरणांपैकी एक आहे जिथे या न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर, अपीलकर्त्याला त्याच्या दोन्ही शिक्षा रद्द करण्याचा फायदा झाला. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या एप्रिल २०२४ च्या शिक्षेला स्थगिती देण्याच्या अर्जाला आव्हान देणाऱ्या एका पुरुषाच्या अपिलावर न्यायालयाने हा निर्णय दिला. कनिष्ठ न्यायालयाने या प्रकरणात पुरुषाला दोषी ठरवले आणि त्याला १० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आणि ५५,००० रुपयांचा दंड ठोठावला. खंडपीठाच्या म्हणण्यानुसार, त्यांनी अपीलकर्ता आणि महिलेशी त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत बोलावले आणि त्यांना लग्न करण्यास तयार असल्याचे कळले.

### संबंधांना गुन्हेगारीस्वरूप

न्यायालयाने अपीलकर्त्याला अंतरिम जामीन मंजूर केला. या प्रकरणात पूर्ण न्याय करण्यासाठी संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत आमच्या अधिकारांचा वापर केला आहे आणि तक्रार तसेच अपीलकर्त्याविरुद्ध दिलेली शिक्षा आणि शिक्षा बाजूला ठेवली आहे. आमचे असे मत आहे की गैरसमजामुळे, पक्षकारांमधील संमतीने झालेल्या संबंधांना गुन्हेगारीस्वरूप देण्यात आले.

# "काँग्रेसच्या राज्यात बुलडोझर राज"

## अल्पसंख्याक विरोधी राजकारण काँग्रेस सरकारनेही सुरू केले आहे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी कर्नाटकातील काँग्रेस सरकारवर 'बुलडोझर राज' सुरू केल्याची टीका केली होती. त्यावर आता कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. बंगळुरूतील फकीर कॉलनी आणि वसीम लेआऊट परिसरात अतिक्रमण हटवण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.**

अतिक्रमण हटवल्याने ३०० कुटुंबांची घरे पाडण्यात आली आहेत. यात प्रामुख्याने मुस्लीम कुटुंबिय आहेत. दरम्यान, सरकारी जमिनीवरील अतिक्रमण काढले जात असून त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येणार असल्याचे शिवकुमार यांनी सांगितले. यावर आता राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी कर्नाटकमधील काँग्रेस सरकारवर टीका करताना म्हटले होते की, "बंगळुरूमधील फकीर कॉलनी आणि वसीम लेआऊट भागात मुस्लिम कुटुंबांच्या घरांवर बुलडोझर चालवले जात आहे. 'बुलडोझर राज' हे आता सामान्य झाले आहे. संघ परिवाराचे अल्पसंख्याक विरोधी राजकारण आता कर्नाटकातल्या



काँग्रेस सरकारनेही सुरू केले आहे." दरम्यान, विजयन यांनी 'बुलडोझर राज' विरोधात डाव्या विचारसरणीच्या पक्षांना एकत्रित येण्याची गरज असल्याचे म्हटले आहे.केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या टीकेवर डी. के. शिवकुमार म्हणाले, "आम्ही न्यायासाठी बुलडोझरचा वापर करत नाही. बुलडोझरचा वापर करून आम्ही काहीही केलेले नाही. आम्ही त्या जागेवरील अतिक्रमण काढण्याचा आणि सरकारी जमिनीचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. तथ्य जाणून न घेता पीनराई विजयन यांनी या विषयावर प्रतिक्रिया द्यायला नको होती, केरळमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकांसाठी ही राजकीय खेळी आहे."कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने बंगळुरूमधील फकीर कॉलनीत अतिक्रमण हटवण्याची मोहीम सुरू केली. याबाबत डी.के. शिवकुमार म्हणाले, "सरकारी जमिनीवर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी मोहीम सुरू झाली आहे. त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्या जागेवर खाणकाम झाले असून तिथे आरोग्यास धोका आहे. तेथील लोकांनी ती जागा बळकावण्याचा प्रयत्न केला आहे

### जागा बळकावण्याचा प्रयत्न

अतिक्रमण हटवल्याने बेघर झालेल्या नागरिकांना घरे देण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतल्याचे शिवकुमार यांनी सांगितले आहे. ते म्हणाले, "जर कोणाला घर हवे असेल तर आम्ही त्यांना नक्की घर देऊ. आम्ही लाखो घरे बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. अतिक्रमण हटवल्याने खरोखर ज्यांचे नुकसान झाले त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी आम्ही चर्चा करत आहोत.

# माझी आई माझे पैसे



बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.सारा अली खानने नुकताच टाइम्स नाऊ समिट २०२५ मध्ये हजेरी लावली होती. यावेळी आर्थिक गुंतवणूकीबाबत सारा अली खान म्हणाली, “माझी आई माझे पैसे हाताळते. अगदी माझे जी पे(GPAY) अकाउंटदेखील तिच्या अकाउंटबरोबर जोडलेले आहे, माझा ओटीपी नंबर तिच्या मोबाईलवर येतात.”शाळेत असताना जसा इतरांना पॉकेट मनी मिळतो. तसा तुला आता पॉकटे मनी मिळतो का? यावर सारा म्हणाली, “पॉकेट मनी विसरा, मी तिला विचारल्याशिवाय तिकीटदेखील बुक करू शकत नाही.” पुढे ती आर्थिक कुठे गुंतवणूक करते असे विचारले असता अभिनेत्री म्हणाली, “रिअल इस्टेट, शेअर बाजार, सोन्याचे बाँडमध्ये गुंतवणूक करत असल्याचा खुलासा केला. सारा अली खान अमृता सिंग व सैफ अली खान यांची मुलगी आहे. सैफ अली खान व अमृता सिंगने १९९१ मध्ये लग्नगाठ बांधली होती. मात्र, २००४ मध्ये त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. त्यांना सारासह इब्राहिम अली खान हा मुलगादेखील आहे. त्यानंतर सैफ अली खानने करीना कपूरशी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. त्यांना तैमूर व जेह ही मुले आहेत. सैफने दुसरे लग्न केले असले तरी त्याचे सारा व इब्राहिमबरोबर उत्तम नाते असल्याचे पाहायला मिळते. अनेक सण-उत्सव ते एकत्र साजरे करतात. सारा, इब्राहिम, जेह व तैमूर यांच्यातील बॉण्डिंगदेखील लक्ष वेधून घेताना दिसते.जानेवारी महिन्यात सैफ अली खानवर एका अज्ञात व्यक्तीने घरात घुसून चाकू हल्ला केला होता. त्यावेळी हे कुटुंब मोठ्या चर्चेत आले होते. करीना कपूर, शर्मीला टागोर यांच्यासह सारा-इब्राहिमदेखील चिंतेत असल्याचे दिसले होते. आता हे कुटुंब त्यांच्या सुरक्षेची काळजी घेताना दिसते.

बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.

बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.

# आमिषाचा खुलासा



सध्या मनोरंजन विश्वात दोन सिनेमे धुमाकूळ घातला आहे. त्यात एक आहे 'गदर2' आणि दुसरा आहे 'OMG2'. गदर2 च्या माध्यमातुन सनी देओल आणि आमिषा पटेल यांनी बऱ्याच वर्षानंतर मोठ्या पडद्यावर एंट्री केली आहे. दोघांची जोडी देखील प्रेक्षकांना खुप आवडत आहे. दरम्यान अमिषाने या चित्रपटाला मिळालेल्या यशानंतर अनेक मुलाखती दिल्या आहेत.
याच एका मुलाखतीत तिने तिच्या फ्लॉप चित्रपटाबाबत सलमान खानला जबाबदार धरले आहे.
तब्बल दोन दशकांनंतर आमिषाचा गदर 2 चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला आहे. अमीषाने तिच्या करिअरच्या सुरुवातीला दोन सुपरहिट चित्रपट दिले, पण नंतर तिच्यावर फ्लॉप चित्रपटांचा शिक्का लागला.
दरम्यान ती एका मुलाखतीत तिच्या 2002 मध्ये प्रदर्शित झालेल्या तिच्या 'ये है जलवा' या फ्लॉप चित्रपटाबद्दल बोलली.
या चित्रपटात तिच्या सोबत बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान हा मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटाची स्टोरी जरी चांगली असली तरी हा सिनेमा काही खास कमाल करु शकला नाही. याबद्दल बोलतांना अमीषा पटेल म्हणाली की, डेव्हिड धवनच्या दिग्दर्शनात झालेल्या या चित्रपटात सर्व काही हिट झालं होतं मात्र त्यावेळी सलमान खानच्या 'हिट-अँड-रन' प्रकरणाच्या मीडिया कव्हरेजने या चित्रपटाच्या कामगिरीवर वाईट परिणाम झाला आणि चित्रपट खराब झाला. अमीषा म्हणते,
"ये है जलवा हा डेव्हिड धवनच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक होता. सलमान खुपच देखणा दिसत होता. चित्रपटाचे संगीत आणि सर्व काही चांगले होते.

# अक्षय -रवीनाची जोडी एकत्र?

बॉलिवूडचा खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमार हा सध्या त्याच्या OMG2 या चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याचा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहेत. अक्षयच्या गेल्या काही चित्रपटांकडे पाहिलं तर त्याचे सलग सहा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाले होते मात्र OMG2 ने आता अक्षयच्या फ्लॉप सिनेमांवर फुल स्टॉप लावला आहे. सध्या अक्षय कुमार त्याच्या सिनेमातील अभिनेत्रीच्या नावामुळे चर्चेत असते. आता अक्षयच्या पुढच्या चित्रपटात त्याची एक्स गर्लफ्रेंड रवीना टंडन सोबत दिसणार असल्याचं बोललं जात आहे. बॉलिवूडमध्ये असा एक काळ होता ज्यावेळी अक्षय कुमार आणि रवीना टंडन यांची जोडी बॉक्स ऑफिसवर सुपरहिट होती. अनेक सिनेमांमध्ये त्यांनी एकत्र काम केले होते. ही जोडी बॉलिवूडमधील सर्वात हिट जोडींपैकी एक आहे. यासोबतच दोघांनीही एकमेकांना बराच काळ डेट केले होते. मात्र काही काळानंतर दोघेही वेगळे झाले. त्याचे प्रेम प्रकरण आणि ब्रेकअप आणि नंतर दुसऱ्याशी लग्न झाल्यानंतर दोघांची जोडी पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळाली नाही. त्याचे चाहते या जोडीला खुप मिस करत होते. त्यांना एकत्र पाहण्यासाठी चाहते अजूनही उत्सुक आहेत. आता तब्बल 19 वर्षांनंतर पुन्हा एकदा ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. मीडियाने दिलेल्या वृत्तानुसार, अक्षय कुमार आणि रवीना टंडन आता 'वेलकम 3'मध्ये एकत्र काम करणार आहेत. 'वेलकम टू द जंगल'मध्ये ही जोडी प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत.



# त्या व्हिडिओनं नेटकरी हँग!



उर्फी जावेद ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या अतरंगी फॅशनमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. त्यावरुन उर्फीला अनेकांनी साम, दाम, दंड आणि भेद याप्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा तिच्यावर काहीही परिणाम झालेला नाही. आता उर्फीच्या हटके फॅशनचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात तिनं जी वेशभूषा केली आहे त्यावरुन तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. अनेकांनी उर्फीवर नेहमीप्रमाणे जोरदार टीका केली आहे. काहींनी तर उर्फीच्या हटके स्टाईलवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. एवढी भारी आयडिया उर्फीला सुचते तरी कशी, असा प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारला आहे.
यापूर्वी उर्फीनं वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करुन तिची फॅशनची हौस पूर्ण केली आहे. घरातील ग्लास, भांडी, मोबाईल फोन आणि चक्क कंगव्याचा ड्रेस उर्फीनं परिधान करुन आपण किती क्रिएटिव्ह आहोत याचा परिचय करुन दिला आहे. तिचा तो अंदाज सोशल मीडियावर नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. उर्फीनं तो व्हिडिओ शेयर केल्यानंतर त्यावर आलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहेत. एकानं लिहिलं आहे की, मी घरातील माझा कंगवा शोधत होतो. जेव्हा उर्फीचा व्हिडिओ पाहिला तेव्हा मात्र मला धक्काच बसला. उर्फी माझा कंगवा घेऊन गेली. आता काय बोलावं. दुसऱ्या युझर्सनं म्हटले की, उर्फी घरात तर पूर्ण कपड्यात असते. घराबाहेर पडल्यावर ती अशी का वागते हे कळत नाही. तिसऱ्या युझर्सनं लिहिलं आहे, बस किंवा ट्रेनमध्ये काहीजण कंगवा विकण्यासाठी येतात हे आम्हाला माहिती होतं. पण आता उर्फी देखील हा नवा बिझनेस करु लागली आहे की काय, असा प्रश्न तिचा तो व्हिडिओ पाहिल्यावर पडतो. एवढी कल्पनाशक्ती येते कुठून, असे प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारले आहेत.

# शो संपताच श्रेयस तळपदे भावुक

झी मराठीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो ‘चल भावा सिटीत’चा महाअंतिम सोहळा रविवारी (१ जून) रोजी दिमाखात पार पडला. या पहिल्या पर्वाच्या अंतिम फेरीत पाच जोड्यांमध्ये चुरशीच्या लढत रंगली होती. शोच्या अंतिम सोहळ्यात अथर्व-रेवती, विजय-अनुश्री, ऋषिकेश-श्रुती, दिपक-प्रणाली आणि रामा-नीता या पाच जोड्या पोहोचल्या होत्या. यापैकी श्रुती राऊळ आणि ऋषिकेश चव्हाण या जोडीने बाजी मारली. या शोच्या निमित्ताने बॉलीवूडसह मराठी मनोरंजन विश्वात आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारा अभिनेता श्रेयस तळपदेने छोट्या पडद्यावर पुन्हा एकदा आपली



जादू दाखवली. ‘चल भावा सिटीत’ या रिॲलिटी शोच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी श्रेयसवर होती आणि त्याने ही जबाबदारी अगदी चोखपणे पार पाडली. श्रेयसने आधी झी मराठीवरीलच ‘माझी तुझी रेशीमगाठ’ मालिकेतून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं होतं.चल भावा सिटीत’ शोची सांगता होताच श्रेयसने सोशल मीडियावर त्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत. खास व्हिडीओ शेअर करत श्रेयस असं म्हणतो, “मित्रांनो अशाप्रकारे आपल्या ‘चल भावा सिटीत’ची सांगता होत आहे. ज्या प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले, उत्कृष्ट प्रतिसाद दिला, न चुकता शो पाहिला. त्यांचे मी सर्व प्रथम आभार मानतो. तुमच्या प्रेमामुळे, पाठिंब्याने आम्हाला उत्तम काम करण्याची स्फूर्ती येते.”

## एकदिवसीय क्रमवारीत अव्वल

## भारतीय संघाचा जागतिक क्रिकेटमध्ये डंका

# ‘RO-KO’ साठी 2025 वर्ष ठरले शानदार!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाचा जागतिक क्रिकेट विश्वात चांगलाच दबदबा राखून आहे. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात भारतीय क्रिकेट संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. त्यानंतर गेल्या तीन वर्षांत, व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये भारतीय क्रिकेट संघाने आपले स्थान अधिक बळकट केले. कारण, दशकांच्या क्रिकेट इतिहासात प्रथमच भारतीय संघ हॅटट्रिकसह आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थानी येण्यास सज्ज झाला आहे.**

## ICC रँकिंगमध्ये साधली हॅटट्रिक




३०८ एकदिवसीय सामन्यांमध्ये वर्चस्व राखले. या दरम्यान खेळलेल्या ३०८ सामन्यांमध्ये त्याने १४,५५७ धावा फटकावल्या आहेत. ज्यामध्ये विक्रमी ५३ शतके आणि ७६ अर्धशतकांचा समावेश आहे. मागील तीन वर्षांत, जेव्हा भारतीय संघ वर्षाच्या अखेरीस गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहिला होता, तेव्हा विराटने या तीन वर्षांत ४३ सामन्यांमध्ये ६५ पेक्षा जास्त सरासरीने २०८६ धावा फटकावल्या होत्या.

या दरम्यान त्याने ९ शतके ठोकली होती. २०१७ आणि २०१८ मध्ये, विराटने जगभरातील एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याची किमया साधली होती. त्याने २०१७ मध्ये १४६० धावा आणि २०१५ मध्ये १२०२ धावा काढल्या होत्या. मुंबईचा राजा म्हणून ओळखला जाणारा माजी कर्णधार रोहित शर्माचा आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यांमध्ये चांगलाच प्रभाव दिसून आला. गेल्या तीन वर्षांत त्याची फलंदाजी अधिकच खुलून दिसत आहे. २००७ ते २०२५ या दीड दशकाच्या कारकीर्दीमध्ये, रोहित शर्माने २७९ एकदिवसीय सामन्यांमध्ये ४९.२१ च्या सरासरीने ११५१६ धावा फटकावल्या आहेत. ज्यामध्ये त्याने ३३ शतके झळकवली आहेत. गेल्या तीन वर्षांत, २०२३ ते २०२५ पर्यंत, रोहित शर्माने ४४ एकदिवसीय सामन्यांमध्ये ५१.५५ च्या सरासरीने २०६२ धावा काढल्या असून ज्यामध्ये त्याने चार शतके ठोकली आहेत.

२०२५ च्या अखेरीस, तो अखेर आयसीसी क्रमवारीत नंबर १ क्रमांकाचा खेळाडू बनला आहे तर विराट कोहली दुसऱ्या क्रमांकावर विराजमान होता.भारतीय क्रिकेट संघाचा जागतिक क्रिकेट विश्वात चांगलाच दबदबा राखून आहे. २०२३ च्या एकदिवसीय

## रोहित शर्माची खास जादू

ज्यामध्ये त्याने ३३ शतके झळकवली आहेत. गेल्या तीन वर्षांत, २०२३ ते २०२५ पर्यंत, रोहित शर्माने ४४ एकदिवसीय सामन्यांमध्ये ५१.५५ च्या सरासरीने २०६२ धावा काढल्या असून ज्यामध्ये त्याने चार शतके ठोकली आहेत. २०२५ च्या अखेरीस, तो अखेर आयसीसी क्रमवारीत नंबर १ क्रमांकाचा खेळाडू बनला आहे तर विराट कोहली दुसऱ्या क्रमांकावर विराजमान होता. भारतीय क्रिकेट संघाचा जागतिक क्रिकेट विश्वात चांगलाच दबदबा राखून आहे.

विश्वचषकात भारतीय क्रिकेट संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. त्यानंतर गेल्या तीन वर्षांत, व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये भारतीय क्रिकेट संघाने आपले स्थान अधिक बळकट केले.

कारण, दशकांच्या क्रिकेट इतिहासात प्रथमच भारतीय संघ हॅटट्रिकसह आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थानी येण्यास सज्ज झाला आहे.३०८ एकदिवसीय सामन्यांमध्ये वर्चस्व राखले. या दरम्यान खेळलेल्या ३०८ सामन्यांमध्ये त्याने १४,५५७ धावा फटकावल्या आहेत. ज्यामध्ये विक्रमी ५३ शतके आणि ७६ अर्धशतकांचा समावेश आहे. मागील तीन वर्षांत, जेव्हा भारतीय संघ वर्षाच्या अखेरीस गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहिला होता, तेव्हा विराटने या तीन वर्षांत ४३ सामन्यांमध्ये ६५ पेक्षा जास्त सरासरीने २०८६ धावा फटकावल्या होत्या. या दरम्यान त्याने ९ शतके ठोकली होती.

२०१७ आणि २०१८ मध्ये, विराटने जगभरातील एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याची किमया साधली होती. त्याने २०१७ मध्ये १४६० धावा आणि २०१५ मध्ये १२०२ धावा काढल्या होत्या.मुंबईचा राजा म्हणून ओळखला जाणारा माजी कर्णधार रोहित शर्मा गेल्या तीन वर्षांत त्याची फलंदाजी अधिकच खुलून दिसत आहे. २००७ ते २०२५ या दीड दशकाच्या कारकीर्दीमध्ये, रोहित शर्माने २७९ एकदिवसीय सामन्यांमध्ये ४९.२१ च्या सरासरीने ११५१६ धावा फटकावल्या आहेत.

# 2025 हे वर्ष भारतीय हॉकीसाठी वाईटच!

## पुरुष संघाचा आशिया कप जेतेपदावर कब्जा, तर महिला संघ अपयशी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मागील वर्षी ऑलिंपिक कांस्यपदक जिंकल्यानंतर, २०२५ हे वर्ष भारतीय हॉकीसाठी निराशाजनकच राहिले आहे. पुरुष संघाने जवळजवळ एक दशकानंतर आशिया कप जेतेपदावर नाव कोरले असले तरी, महिला संघाची सततची घसरण चिंतेचे कारण राहिले आहे.**





भारतीय संघाने पुन्हा एकदा उपखंडात वर्चस्व गाजवले, १५ गोल केले तर फक्त दोन गोल केले. अंतिम सामन्यात, भारताने दिलप्रीत सिंग, सुखजीत सिंग आणि अमित रोहिदास यांच्या गोलसह गतविजेत्या दक्षिण कोरियाचा ४-१ असा पराभव केला. याआधी, FIH प्रो लीगमध्ये त्यांची कामगिरी निराशाजनक होती. हरमनप्रीत सिंगचा संघ नऊ संघांपैकी आठव्या स्थानावर राहिला, रेलीगेशनपासून थोडक्यात बचावला. घरच्या टप्प्यात भुवनेश्वरमध्ये पाच सामने जिंकल्यानंतर, युरोपियन टप्प्यात सलग सात सामने गमावले. भारताच्या युवा संघाने अझलन शाह कपमध्ये रौप्य पदक जिंकले. सहा वर्षांनी ही स्पर्धा खेळणाऱ्या

## युरोपियन ७ सामने गमावले

पखंडात वर्चस्व गाजवले, १५ गोल केले तर फक्त दोन गोल केले. अंतिम सामन्यात, भारताने दिलप्रीत सिंग, सुखजीत सिंग आणि अमित रोहिदास यांच्या गोलसह गतविजेत्या दक्षिण कोरियाचा ४-१ असा पराभव केला. याआधी, FIH प्रो लीगमध्ये त्यांची कामगिरी निराशाजनक होती. हरमनप्रीत सिंगचा संघ नऊ संघांपैकी आठव्या स्थानावर राहिला.

भारताला अंतिम फेरीत जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या बेल्जियमकडून एका गोलने पराभव पत्करावा लागला. तथापि, नवीन कर्णधार आणि बचावपटू संजयसह, हरमनप्रीत आणि मनप्रीत सारख्या वरिष्ठ खेळाडूंशिवाय तरुण संघ पुढे गेला. पुरुषांच्या ज्युनियर संघाने या महिन्यात चेन्नई येथे झालेल्या ज्युनियर हॉकी विश्वचषकात नऊ वर्षांच्या खेळाडूसाठी कांस्यपदक जिंकले. कांस्यपदकाच्या सामन्यात अर्जेंटिनाकडून दोन गोलने पिछाडीवर पडल्यानंतर भारताने ४-२ असा विजय मिळवला. एंजेलिस ऑलिंपिकमध्ये थेट प्रवेश मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार ।
दि. 28 डिसेंबर 2025

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


## लाडक्या बहिणीला पैसे नकोत, जीवाचं संरक्षण द्या!" – प्रज्ञा वाव्हळकर

# "गुन्हे दाखल पतीला भाजप – आरपीआय युतीचे तिकीट?

## कुणाल व्हावळकरांच्या पत्नीचा भाजप-आरपीआयवर सणसणीत आरोप

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजप सरकार 'लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाच्या गप्पा मारत असताना, पिंपरी-चिंचवडमध्ये मात्र एका महिलेवर होत असलेल्या अन्यायामुळे मोठा राजकीय आणि सामाजिक प्रश्न ऐरणीवर आला आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर यांना भाजप-आरपीआय युतीकडून महापालिका निवडणुकीचे तिकिट देण्याच्या हालचाली सुरू असताना, त्यांच्याच पत्नी प्रज्ञा कुणाल वाव्हळकर यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजप, आरपीआय आणि संपूर्ण युतीवर जोरदार हल्लाबोल केला आहे.**



प्रज्ञा वावळकर यांनी थेट सवाल उपस्थित करत विचारले की, "भाजप नेमक्या कोणत्या आधारावर कुणाल वाव्हळकर यांना महापालिकेचे तिकिट देत आहे? ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत, ज्यांच्याविरोधात माझी स्वतःची चार्जशीट न्यायालयात दाखल आहे, अशा व्यक्तीला लोकप्रतिनिधी बनवण्याचा भाजपचा विचार आहे का?" कुणाल वाव्हळकर हे प्रभाग क्रमांक २५ व २६ मधून निवडणूक लढवणार असल्याचे बोलले जात असताना, त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील गंभीर प्रश्नांकडे भाजप व आरपीआय जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप प्रज्ञा वाव्हळकर यांनी केला. "एकीकडे भाजप सरकार महिलांना 'लाडकी बहीण' म्हणत दरमहा पंधराशे रुपये देते, पण दुसरीकडे एका विवाहित महिलेला आणि तिच्या अल्पवयीन मुलीला वाऱ्यावर सोडले जाते. हाच महिलांसाठीचा न्याय आहे का?" असा संतप्त सवाल त्यांनी या वेळी उपस्थित केला.

प्रज्ञा वाव्हळकर यांनी पत्रकार परिषदेत आपल्या वैयक्तिक आयुष्यातील वेदनादायक वास्तव मांडले. "कुणाल वाव्हळकर हे ना मला पाहतात, ना माझ्या मुलीची जबाबदारी घेतात. आजपर्यंत माझ्या मुलीच्या पालन-पोषणासाठी एक रुपयाचीही पोटगी दिलेली नाही. आमचा घटस्फोट अद्याप झालेला नाही, तरीही मला भाड्याच्या घरात राहण्याची वेळ आली आहे," असे त्यांनी सांगितले.

"जे स्वतःच्या पत्नी आणि मुलीची जबाबदारी पार पाडू शकत नाहीत, ते पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांची लोप्रतिनिधी म्हणून जबाबदारी कशी पार पाडणार?" असा संतप्त सवाल करत त्यांनी भाजपच्या 'सुशासन' आणि 'नैतिकते'च्या दाव्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यावेळी त्यांनी सुरक्षेचा मुद्दा ठळकपणे मांडला. "आज आमच्यावर एवढा अन्याय होत आहे. उद्या जर हेच व्यक्ती सत्तेवर आले, तर मला आणि माझ्या मुलीला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मला लाडकी बहीण योजनेतून पैसे नकोत, मला संरक्षण हवं आहे," अशी ठाम आणि भावनिक मागणी त्यांनी केली.

### भाजप-आरपीआय युतीच्या उमेदवार निवडीवर प्रश्नचिन्ह

प्रज्ञा वाव्हळकर यांनी यावेळी मोठी राजकीय घोषणा करत पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात खळबळ उडवून दिली. "कुणाल वाव्हळकर हे शहरातील कोणत्याही प्रभागातून निवडणूक लढू देत, मी स्वतः त्यांच्याविरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. प्रभाग क्रमांक २५ किंवा २६ असो मी त्यांच्या विरोधात ते पिंपरी चिंचवड शहरातील कोणत्याही प्रभागातून निवडणूक लढूदेत मी त्यांच्या विरोधात त्यांची पत्नी म्हणून, एक अन्यायग्रस्त महिला म्हणून महापालिकेची निवडणूक लढवणार," असे त्यांनी जाहीर केले.

दरम्यान, या प्रकरणामुळे भाजप-आरपीआय युतीच्या उमेदवार निवडीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महिलांच्या सुरक्षेच्या आणि सन्मानाच्या मुद्द्यावर राजकारण करणाऱ्या पक्षांची खरी भूमिका काय आहे, हा प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

# 'आंतरराष्ट्रीय परिषदांमधून संशोधकांच्या ज्ञान कक्षा रुंदावतात'; प्रा. डॉ. विक्रम गद्रे

## शिक्षण विश्व: पीसीसीओईआर येथे " फ्यूजनएक्स ग्लोबल" आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठी तसेच नाविन्यपूर्ण संशोधनाचे संकल्पना घेऊन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेमधील सहभागाने ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. विविध क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकांशी विद्यार्थ्यांना संवाद साधता येतो. यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळते. त्याचबरोबर देशाच्या विकासासही हातभार लागतो, असे मत आयआयटी मुंबईचे इलेक्ट्रिक विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विक्रम गद्रे यांनी व्यक्त केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च रावेत येथे आंतरविद्याशाखीय तंत्रज्ञान आणि विज्ञान अभिसरण (फ्यूजनएक्स ग्लोबल) या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन शुक्रवारी (२६ डिसेंबर) डॉ. गद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सीओईपीचे डॉ. प्रशांत बारटक्के, आयआयआयटी पुणेचे डॉ. सुशांत कुमार, पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी, फ्यूजनएक्स ग्लोबल परिषदेचे मुख्य संयोजक डॉ. राहुल मापारी, डॉ. गोविंद सुर्यवंशी, डॉ. दिपाली शेंडे आदी उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी भारतासह १६ देशांतील संशोधक लेखकांच्या आठशे प्रवेशिका आल्या. यामधून १५३ प्रवेशिकांची सादरीकरणासाठी निवड करण्यात आली, असे डॉ. राहुल मापारी यांनी सांगितले.

केंद्र सरकारने २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचा मनोदय आहे. अशाप्रकारच्या आंतरराष्ट्रीय परिषदांमधून भारताची नवी ओळख निर्माण करण्यास मदत होते. जागतिक स्तरावर होणारे संशोधन याचा अभ्यास तसेच संशोधकांची संवाद साधण्याची संधी भारतातील नव संशोधकांना मिळते, असे प्रशांत बारटक्के म्हणाले.

संशोधकांना एकमेकांशी संवाद साधण्या बरोबरच नवकल्पना प्रत्यक्ष मांडण्यास फ्यूजनएक्स ग्लोबल सारख्या परिषदांमधून मदत मिळते. या संधीचा नव संशोधकांनी फायदा घेतला पाहिजे. तसेच संशोधनामध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी अशा परिषदांमधून मदत मिळते, असे सुशांत कुमार यांनी सांगितले.

दुपारच्या सत्रात दिनेश मंडलपू, डॉ व्हायोलेटा क्वेटकोस्का, नयन सरोदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### नागरिकांचा वाढता पाठिंबा देतोय

# अनुराधा साळुंके यांच्या विजयाची खात्री!

## प्रभाग क्रमांक 3 मधील तापकीर वस्ती, बुर्डेवस्ती आणि चऱ्होली परिसरातील नागरिकांचा पाठिंबा



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चऱ्होली प्रभाग क्रमांक 3 मध्ये निवडणुकीचे वातावरण तापले असून अपक्ष उमेदवार अनुराधा साळुंके यांना जनसामान्यांचा वाढता पाठिंबा मिळताना दिसत आहे. तापकीर वस्ती, बुर्डेवस्ती आणि चऱ्होली परिसरातील नागरिकांनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. माजी नगरसेविका सुरेखाताई बाळासाहेब माटे यांनी साळुंके यांना जाहीर पाठिंबा दिल्यामुळे निवडणुकीत चुरस वाढली आहे.**

प्रचारादरम्यान अनुराधा साळुंके यांचा दांडगा जनसंपर्क दिसून येत असून तरुण वर्गामध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांचा पाठिंबा आणि महिलांचा मोठा सहभाग त्यांच्या प्रचारात दिसत आहे. जनतेकडून मिळणारा विश्वास पाहता आपण पूर्ण ताकदीने निवडून येऊ असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

अनुराधा साळुंके यांनी प्रभागातील मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देण्याची भूमिका घेतली आहे. पाणीपुरवठा आणि रस्त्यांची समस्या सोडवणे महिला सुरक्षेवर आणि आरोग्यावर लक्ष केंद्रित करणे तसेच प्रभागाचा सर्वांगीण विकास करून नागरिकांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा निर्धार आहे.




नागरिकांचा वाढता प्रतिसाद ठरवतोय विजयाची दिशा!

अनुराधा साळुंके यांच्या जमेच्या बाजूंमध्ये विकासाभिमुख दृष्टीकोन, संघटनात्मक, अनुभव, थेट जनतेशी संवाद, स्थानिक प्रश्नांची सखोल माहिती आणि महिलांचे सक्षम नेतृत्व या बाबींचा समावेश होतो. समाजकार्यातील अनुभवामुळे त्या नागरिकांच्या समस्या समजून घेऊन प्रभावी उपाययोजना करू शकतात असा विश्वास मतदारांमध्ये दिसून येत आहे. महिला वर्गाशी झालेल्या संवादात घरगुती आणि आरोग्यविषयक प्रश्न गंभीर असल्याचे समोर आले असून या समस्यांवर केवळ आश्वासन न देता ठोस उपाय करण्याचे वचन आपण दिल्याचे अनुराधा साळुंके यांनी सांगितले जनतेकडून मिळणारा वाढता प्रतिसाद हा आपल्या विजयाची दिशा दाखवणारा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

### प्रभाग १० मध्ये भाजपाचा शक्तिप्रदर्शनात्मक प्रारंभ

## गोरखे, चांदगुडे, हिंगे, कदम यांच्या उमेदवारीसाठी हजारोंची भव्य पदयात्रा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये भाजपाच्या चारही उमेदवारांनी प्रचाराची जोरदार आघाडी घेतली असून, आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या निमित्ताने हजारो मतदारांच्या उपस्थितीत भव्य पदयात्रेच्या माध्यमातून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.**




या पदयात्रेत प्रभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संत ज्ञानेश्वर नगर (म्हाडा), मोरवाडी, लालटोपी नगर, अमृतेश्वर कॉलनी, इंदिरानगर, सरस्वती विश्व विद्यालय परिसर, आंबेडकर नगर, एच.डी.एफ.सी. कॉलनी, दत्तनगर, विद्यानगर, शाहूनगर, वृंदावन सोसायटी आणि संभाजीनगर या परिसरांतून ही प्रचार रॅली काढण्यात आली. शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विद्यानगर येथील हनुमान मंदिरापासून पदयात्रेला प्रारंभ झाला. रामेश्वर व दत्त मंदिर, संभाजीनगर येथे पदयात्रेचा समारोप झाला. या प्रसंगी भाजपाचे आमदार अमित गोरखे, तसेच माजी महापौर मंगलाताई कदम, माजी नगरसेवक राजाभाऊ दुर्गे, जिल्हा उपाध्यक्ष अजित भालेराव, मंडल अध्यक्ष धरम वाघमारे, राजेंद्र ढवळे, सौ सोनाली ताई हिंगे, श्री गौरव कदम, इत्यादी मान्यवरांसह असंख्य कार्यकर्ते, नागरिक बंधू आणि भगिनी उपस्थित होते. तसेच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक १० मधून भाजपाचे उमेदवार श्रीमती अनुराधा गणपत गोरखे, सुप्रिया महेश चांदगुडे, कुशाग्र मंगला अशोक कदम आणि तुषार रघुनाथ हिंगे यांच्या प्रचाराचा धडाका सुरू झाला.

यावेळी उमेदवारांनी भूमिका मांडताना सांगितले की, "प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आमचे प्रयत्न सातत्याने सुरू राहतील. प्रत्येक नागरिकापर्यंत विकासकामे पोहोचवणे, सुविधा उपलब्ध करून देणे आणि जीवनमान उंचावणे ही आमची प्रमुख जबाबदारी आहे. "प्रभागाच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी आरोग्य व शिक्षण या दोन मूलभूत घटकांना केंद्रस्थानी ठेवून नियोजनबद्ध पद्धतीने काम केले जाईल. प्रत्येक नागरिकाला सुलभ, परवडणाऱ्या आणि दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी प्राथमिक आरोग्य सेवा बळकट करणे, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासण्या, माता-बाल आरोग्य योजना तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल. त्याचबरोबर, दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम आणि आत्मनिर्भर पिढी घडवण्यासाठी शाळांच्या पायाभूत सुविधा, डिजिटल शिक्षण, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे आणि कौशल्यविकास उपक्रम प्रभावीपणे राबविले जातील. आरोग्यपूर्ण शरीर आणि सशक्त विचार असलेला समाज घडवणे हेच आमचे विकासात्मक ध्येय असून, या माध्यमातून प्रभागाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा आमचा संकल्प आहे." सर्व नागरिकांनी एकत्र येऊन प्रभागाच्या प्रगतीसाठी साथ द्यावी." असे आवाहन चारही उमेदवारांनी यावेळी केले.

## भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊर्जेचा अद्वितीय संगम

# भोसरीत पादुका दर्शनाचा अभूतपूर्व सोहळा संपन्न!

## 22 हजारांहून अधिक भाविकांनी घेतले दर्शन; विराज लांडे यांच्या वतीने आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी परिसरात भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊर्जेचा अद्वितीय संगम साधणारा 'ऊर्जास्पर्श' पादुका दर्शन सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात २२ हजारांपेक्षा अधिक भाविकांनी दर्शन घेतले. सकाळपासूनच भाविकांनी मोठी गर्दी केली होती. लांबच लांब रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता.**

पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच भारतातील नामवंत नऊ संत, महंत व शक्तिपीठांच्या मूळ पादुकांचे दर्शन एकाच ठिकाणी घडवून आणण्यात आले. प्रभाग क्रमांक ७ मधील दत्त मंदिर, लांडेवाडी, भोसरी येथे गुरुवारी (दि. २४) सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा भव्य आध्यात्मिक सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन युवा नेते विराज विश्वनाथ लांडे यांनी केले होते. भोसरी विधानसभेचे पहिले आमदार विलास लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. दर्शनासोबतच महाप्रसाद व सामूहिक भजनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.



या सोहळ्यात प्रभू श्रीराम (चित्रकूट) प्रासादिक पादुका, श्री साईबाबा (शिर्डी), श्री गजानन महाराज, श्री स्वामी समर्थ, नृसिंह सरस्वती महाराज (औदुंबर), ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, सद्गुरू शंकर महाराज (धनकवडी), श्री रामदास स्वामी (सज्जनगड) आणि प.पू. श्रीधर स्वामी महाराज यांच्या मूळ पादुकांचे दर्शन भाविकांनी घेतले. संत-महंतांनी दाखवलेल्या भक्ती, सेवा, त्याग, समता आणि सदाचाराच्या मार्गाची अनुभूती या सोहळ्यातून मिळाल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रम शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. भोसरीत आयोजित हा पादुका दर्शन सोहळा भाविकांच्या मनावर ठसा उमटवून गेला.



## संकल्प विकासाचा, शंखनाद विजयाचा : चारही उमेदवार होणार विजयी!

## पिंपळे सौदागर-रहाटणी प्रभाग क्र. 28 मध्ये शत्रुघ्न काटे यांचा विश्वास

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून लक्षवेधी विकासकामे झाली आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत या प्रभागातून सर्वप्रथम चारही नगरसेवक निवडून येतील, असा मला विश्वास आहे. भाजपाकडून इच्छुक असलेल्या प्रभागातील 12 उमेदवारांमध्ये कोणताही मनभेद नाही. ज्यांना उमेदवारी मिळेल, त्यांचे काम आम्ही 'भाजपा परिवार' म्हणून करणार आहोत, अशी भावना भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केली.**



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या प्रचारात भाजपाचे नगरसेवक उमेदवार शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वात प्रभाग क्र. 28 (पिंपळे सौदागर-रहाटणी) क्षेत्रात जोरदार प्रचार सुरू केला आहे. ग्रामदेवत श्री मुंजोबा मंदिरात आशिर्वाद घेण्यात आला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिल्पासमोर नतमस्तक होत प्रचाराचा शंखनाद केला. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, नागरिक आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पिंपळे सौदागर- रहाटणी प्रभागात फाईव्ह गार्डन, शिवार गॉर्डन, प्लनेट मिलेनीयम, कापसे लॉन, रामनगर, पिंपळे सौदागर, कुणाल आयकॉन, रोझ लॅक, गोविंद गार्डन यासारख्या प्रमुख वस्ती क्षेत्रात शत्रुघ्न काटे यांच्या कार्याची दखल घेतली जात आहे. शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली पिंपळे सौदागर आणि रहाटणी क्षेत्रात बऱ्याच विकासकामांचा लाभ झाला आहे. त्याचबरोबर काटे यांची ओळख एक कार्यक्षम, नागरिकाभिमुख नेता म्हणून होत आहे. माझ्या प्रभागाच्या विकासासाठी, लोकांच्या भल्यासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी मी कटिबद्ध आहे. यावेळी एकजूट आणि समर्पणाच्या साथीने हा विजय प्राप्त करू," अशी ठाम घोषणा त्यांनी केली.

> " माझ्या प्रभागाच्या प्रत्येक नागरिकाच्या हितासाठी, त्याच्या विकासासाठी आणि त्याच्या जीवनाच्या दर्जाच्या सुधारण्यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. आपल्यासमोर असलेल्या प्रत्येक समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि प्रगतीची नवी दिशा दाखवण्यासाठी भारतीय जनता पार्टीने जे कार्य केले आहे, त्यात आम्ही अधिक योगदान देणार आहे. पिंपळे सौदागर, रहाटणी आणि या क्षेत्रातील सर्व नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम आम्ही खंबीरपणे सुरू ठेवणार आहे. पिंपळे सौदागर- रहाटणीसह पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प आम्ही केला आहे. **–शत्रुघ्न काटे,** उमेदवार, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### कॅम्पसमधील सर्वजण एकत्र येऊन घेतला नाताळचा आनंद

# डॉ डी वाय पाटील टेक्निकल कॅम्पसमध्ये नाताळाचा उत्साह!

## शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांनी घडविले एकात्मतेचे दर्शन; लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**तळेगाव वराळे येथे डॉ डी वाय पाटील टेक्निकल कॅम्पसमध्ये नाताळ सण मोठ्या उत्साहात आणि एकात्मतेच्या भावनेत साजरा करण्यात आला या उत्सवात कर्मचारी आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले.**

कॅम्पसमधील सर्वजण एकत्र येऊन सणाचा आनंद घेत असल्याचे चित्र पाहायला मिळाले या उपक्रमातून एकोपा करुणा आणि सांस्कृतिक सलोखा जपण्याची संस्थेची बांधिलकी स्पष्ट झाली. हा कार्यक्रम संस्थेचे संस्थापक डॉ. सुशांत पाटील, ॲड अनुजा पाटील, प्राचार्य डॉ. शिरबहादूरकर, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. योगेश गुरव तसेच सर्व विभागप्रमुख आणि प्राध्यापक यांच्या उपस्थितीत पार पडला.

ख्रिसमसच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण कॅम्पस आकर्षक पद्धतीने सजविण्यात आला होता. यामुळे परिसरात आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमादरम्यान विविध मनोरंजनात्मक उपक्रम आणि खेळांचे आयोजन करण्यात आले.सर्व उपस्थितांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. भेटवस्तूंचे वाटप हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. विशेषतः लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसून आला. कार्यक्रमात लहान मुलांनी ख्रिसमस थीमवर आधारित गीते आणि नृत्य सादर केली. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला.

> “ डॉ डी वाय पाटील टेक्निकल कॅम्पसमधील ख्रिसमस साजरा आनंदी आणि सन्मानपूर्वक वातावरणात पार पडला या कार्यक्रमातून एकता वाटणी आणि सद्भावना यांसारख्या मूल्यांचा प्रसार झाला. शैक्षणिक समुदायातील नाती अधिक दृढ करण्यासाठी सण एकत्र साजरे करण्याचे महत्त्व या उपक्रमातून अधोरेखित झाले.
>
> **–डॉ. सुशांत पाटील,**
> डॉ डी वाय पाटील टेक्निकल कॅम्पस

# “भारत भाग्य विधाता”संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे दर्शन

## शिक्षण विश्व: स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**मोशी येथे स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध शाखांचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन “भारत भाग्य विधाता” या संकल्पनेवर अत्यंत उत्साहात पार पडले.**

या स्नेहसंमेलनात मंजुरी बाई प्राथमिक विद्यालय आदर्श नगर दिघी, मंजुरी बाई माध्यमिक विद्यालय आदर्श नगर दिघी, गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज गंधर्व नगरी मोशी तसेच गायत्री इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चऱ्होली बुद्रुक या शाखांचा सहभाग होता. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे हे स्नेहसंमेलन सांस्कृतिक कार्यक्रमांनी नटले होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विनायक भोंगाळे, प्रमुख पाहुणे वरिष्ठ शास्त्रज्ञ डीआरडीओ पुणे अशोक गोविंद नगरकर , राजमुद्रा अकॅडमी संस्थापक (एमपीएससी यूपीएससी) मनोहर भोले उपस्थित होते. यावेळी संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्या दिवशी स्वागतगीत, गणेशवंदना, नृत्यनाट्य आणि समूहगीत सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कला गुणांचे प्रभावी सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

स्नेहसंमेलनादरम्यान शैक्षणिक, क्रीडा आणि सहशैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. याचवेळी शाळेच्या उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे शिक्षकवर्गामध्ये आनंद आणि प्रेरणा निर्माण झाली.

### नृत्य सादरीकरणाला विशेष दाद

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्य सादरीकरणाला उपस्थितांकडून विशेष दाद मिळाली. टाळ्यांच्या गजरात स्नेहसंमेलनाची सांगता आनंदी वातावरणात झाली. पालकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मनापासून कौतुक करत शाळेच्या उपक्रमांचे अभिनंदन केले. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.